**RTE Act-2009 अंतर्गत**

**शाळा मान्यता (नमुना-दोन)**

जावक क्र.:- जि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./ 28 /2025
जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांचेकार्यालय,
जिल्हा - चंद्रपूर, राज्य - महाराष्ट्र

दिनांक :- 28/02/2025
दुरध्वनी :- 07172-252560
ई मेल :-eopzpchandrapur@gmail.com

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
**गुरुकुल शिक्षण संस्था, चंद्रपूर**

विषय - **बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, 2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाहक्क नियम, 2011 याच्या नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ -1) शासन पत्र क्र VLS- 1002/852/2002 दिनांक 23/09/2002
2) मा. शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे पत्र क्रं प्राथ/ब/7172 दिनांक 27/07/2005
3) NO.NOC 2008/(21/08)SE-I मंत्रालय मुंबई दिनांक 08/05/2008
4) CBSE /AFF//1130195(EX-00158-5226) 2025-26 दिनांक 24/02/2024
5) कार्यालय शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.,चंद्रपूर यांचे पत्र क्रजि.प.चं.प्रा./RTE/शा.मा./2586/2022/दि. 15/07/2022
6) मुख्याध्यापक, **श्री. महर्षी विद्यामंदिर, (CBSE) चंद्रपुर ता. चंद्रपुर** यांचे पत्र दिनांक 03/02/2025
7) गटशिक्षणाधिकारी, प.स. चंद्रपूर यांचा शाळा तपासणी अहवाल दिनांक 02/02/2025

**महोदय/महोदया,**

संदर्भ पत्र क्र. 1 व 2 नुसार **गुरुकुल शिक्षण संस्था, चंद्रपूर** व्दारा संचालित **श्री. महर्षी विद्यामंदिर, (CBSE) चंद्रपुर या ईंग्रजी** माध्यमाच्या खाजगी शाळेला, **सन 2001-2002** पासुन **इयत्ता 1 ली चे वर्ग (फक्त एक तुकडी)** विनाअनुदानित तत्वावर सुरू करण्यास परवानगी दिलेली आहे. संदर्भ क्र. 3 नुसार, No Objection Certificate दिलेले आहे. संदर्भ 4 नुसार दि. 01/04/2025 ते 31/03/2030 या कालावधीसाठी CBSE बोर्डचे, Up to Senior Secondary Level करिता Extention of General Affiliation दिलेले आहे. संदर्भ क्र. 5 नुसार, RTE Act-2009 अंतर्गत दि. 01/02/2022 **पासून दि.**31/01/2025 या कालावधीसाठी **इयत्ता 1 ते 8 वी** करीता शाळा मान्यता (नमुना-दोन) दिलेले आहे. सदर मान्यतेचा कालावधी संपुष्टात आल्याने, संदर्भ क्र. 6 नुसार, शाळेचे मुख्याध्यापकांनी शाळेला पुढिल कालावधीसाठी शाळा मान्यता (नमुना-दोन) देणेबाबत प्रस्ताव सादर केलेला आहे.

संदर्भ क्र. 7 नुसार, गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, **चंद्रपूर** यांनी सदर शाळेची तपासणी करून अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. त्या अहवालानुसार सदर शाळेत सद्या **इयत्ता 1 ते** 12 वी चे वर्ग उपलब्ध आहेत. तसेच सदर शाळा RTE Act-2009 मधील भौतिक सुविधांच्या मानकांची पूर्तता करीत असल्यामूळे शाळेला मान्यता प्रदान करण्याकरीता शिफारस केलेली आहे. त्याआधारे **दिनांक 01/02/2025 पासून दिनांक** 31/01/2028 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी **इयत्ता 1 ते 8 वी** करीता **श्री. महर्षी विद्यामंदिर, (CBSE) चंद्रपुर या** शाळेस खालील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रमाणपत्र देण्यात येत आहे.
**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे-**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवी नंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यासकोणत्याही परिस्थितीतकोणतेही बंधन नसेल.
2. बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, 2009 (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्रबालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचाहक्क अधिनियम, 2011 (जोडपत्र दोन) मधीलतरतूदीचे, शाळा पालन करील.
3. शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना, पहिल्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पुर्णहोईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल. परंतु आणखी असेकी, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीत देखील या प्रमाणकाचे अनुपालनकरण्यात येईल.
4. परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.
5. संस्था/शाळाकोणतीहीकॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
6. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म, जात, किंवा वंश, जन्मठिकाणकिंवा यापैकीकोणत्याही कारणास्तव, शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.
7. (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणारनाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंतकाढून टाकण्यात येणार नाही.
   (दोन) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.
   (तीन) कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्णहोईपर्यंतकोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्णहोणेआवश्यक असणार नाही.
   (चार) प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित प्रमाणपत्र देण्यात येईल.
   (पाच) विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करण्यातयेईल.
   (सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारितकेलेली किमान अर्हता धारणकरणा-या शिक्षकांचीनियुक्तीकरण्यात येईल. आणखी असेकी, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारणन करणा-या शिक्षकांना अशी किमान

अर्हता5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्टकेलेलीत्याची / तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील.

(आठ) शिक्षकाने/शिक्षिकेनेखाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याचीसुनिश्चिती शाळाकरील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारेतयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील.
9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.
10. शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील.

**तपासणी अहवालानुसार शाळेत खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध आहेत-**

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ- **26400 चौ.मी.**
- एकूण बांधकाम क्षेत्रफळ - **9949 चौ.मी.**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ- **10100 चौ.मी.**
- वर्गखोल्यांची संख्या - **80**
- कार्यालय-नि-भांडार-नि- मुख्याध्यापकाची खोली आहे काय ? - **आहे.**
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल अशी व्यवस्था आहे काय ?- **आहे (कमोड आहे)**
- पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे काय ?- **आहे**
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर - **नाही (लागु नाही).**
- अध्यापन अध्ययन साहित्य / खेळ व क्रीडा विषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता आहे काय ? - **आहे.**
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध आहे काय ?- **आहे.**
- सर्व सूविधा विना अडथळा(रॅम्प) उपलब्ध आहेत काय? - **आहे**
- शाळेलासंरक्षण भिंत आहेकाय? - **आहे.**
- शाळेत अग्निशमन यंत्र आहेकाय? - **आहे.**

11. शासनाची मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.
12. शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगणहे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.
13. शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860 (1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनि विश्वस्त व्यवस्था अधिनियम, 1950 अन्ये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.
14. शाळाकोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्ती संघाच्या किंवा इतरकोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.
15. शाळेचे लेखेसनदी लेखापालाकडून लेखा परिक्षित व प्रमाणित करून घ्यावेत आणि नियमानुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरण पत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठविण्यात यावी.
16. तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता संकेतांक 27130102112 असा आहे, हा सांकेतांक या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करतांना कृपयातो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.
17. शिक्षणसंचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेनेसादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.
18. संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही नूतनीकरण असल्यास, नूतनीकरण केल्याची सुनिश्चितता करावी.
19. बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचाहक्क अधिनियम-2009 प्रमाणे शाळेला आवश्यक असणाऱ्या बाबी पूर्ण असने आवश्यक आहे. संदर्भिय तपासणी अहवालाच्या आधारे तसेच अपूर्ण असलेल्या भौतिक सुविधांच्या **मानकांची पूर्तता तिन महिन्याचे आत पूर्ण करण्याचे अटीवर शाळेला** हे शाळा मान्यता (नमुना-दोन) प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे. परंतू प्रत्यक्ष फेरतपासणीच्या वेळी कोणत्याही प्रकारच्या त्रुटी आढळून आल्यास तथाअपुर्ण मानकांची पूर्तता मुदतीत न केल्यास **सदर मान्यता (नमुना-दोन) त्यापूढे आपोआप रद्द करण्यात येईल, हयाची कृपया नोंद घ्यावी.**

Signed by
Ashwini Dhiraj Kelkar
Date: 28-02-2025 13:11:13

**शिक्षणाधिकारी (प्राथ.)**
**जिल्हा परिषद, चंद्रपूर**

Principal
Shree Maharishi Vidya Mandir
Chandrapur (M. S.)

**प्रतिलिपी :-** 1. मुख्याध्यापक, **श्री. महर्षी विद्यामंदिर, (CBSE)** चंद्रपुर पंचायत समिती, **चंद्रपूर** यांना माहितीस अग्रेषीत.

2. गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, **चंद्रपूर** यांना माहितीस तथा उचित कार्यवाहीस अग्रेषीत. सदर शाळा मान्यता नमुना-दोन चे प्रमाणपत्र संबंधित शाळेचे मुख्याध्यापक / अध्यक्ष/ सचिव यांना पोहोचते करुन पोच घ्यावी. व पोचपावती या कार्यालयास तात्काळ सादर करावी.